**गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..**

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

YASH SIDDHI NEWS

RNI NO. MAHMAR/2023/84162

वर्ष २ रे | अंक ७७ वा | शनिवार ०३ ऑगस्ट २०२४ | पाने ४ | किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 77 | Date : 03/08/2024 | blow Saturday | Page 4 Price 4

# उजनीची शंभरीकडे वाटचाल, बळीराजाच्या चेहऱ्यावर आनंद

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

टेंभुर्णी/प्रतिनिधीः : यंदा उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात देखील पहिल्याच टप्प्यात चांगला पाऊस झाला आहे. त्यामुळं उजनी धरणाने गेल्यावर्षीची पाणी साठवण पातळी ओलांडली आहे. उजनीची शंभरीकडे वाटचाल, बळीराजाच्या चेहऱ्यावर आनंद, मागील वर्षीची सर्वोच्च पातळी ओलांडली राज्याच्या विविध भागात सध्या चांगला पाऊस झाला आहे. या पावसामुळं धरणांच्या पाणीसाठ्यात चांगला वाढ होत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. यंदा उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात देखील पहिल्याच टप्प्यात ह्न चांगला पाऊस झाला आहे. त्यामुळं उजनी धरणाने गेल्यावर्षीची पाणी साठवण पातळी ओलांडली आहे. आता धरणाची शंभरीकडे वाटचाल सुरु झाली आहे. सध्या उजनी धरणात ६९.४५ टक्के एवढा पाणीसाठा - गेल्यावर्षी पावसाने ओढ दिल्याने धरण भरणार नाही याचा अंदाज सर्वांना होता. अखेर दुसऱ्या टप्प्यात थोडा चांगला पाऊस झाल्याने गेल्यावर्षी १२ ऑक्टोबर २०२३ रोजी उजनी धरण ५९.६६ टक्के एवढे भरले होते. त्यामुळं वर्षभर पाणी टंचाईची टांगती तालावर सातत्याने समोर होती. काल म्हणजे १ ऑगस्ट रोजी दुपारीउजनी धरणाने गेल्यावर्षीची पाणी पातळी ओलांडून शंभरीकडे प्रवास सुरु केला आहे. शुक्रवारी सायंकाळी सहा



वाजता उजनी धरणात ६९.४५ % एवढा साठा झाला असून २४ हजार ७८८ क्युसेक्स विसर्गाने पाणी धरणाकडे येत आहे.सध्या पुणे जिल्ह्यात पावसाची ये जा सुरु असल्याने धरणात येणाऱ्या पाण्याची आवक देखील सातत्याने बदलत आहे. धरणाची वाटचाल शंभरीकडे सुरु आहे. धरणात १००.८७ टीएमसी पाणी जमा - सध्या उजनी धरणात १०० टीएमसी पेक्षा जास्त पाणीसाठा असून, उजनी धरणाची सुधारत चाललेल्या पाणीपातळीमुळं बळीराजा आनंदी आहे. उजनी धरणावर परिसरातील ४० पेक्षा जास्त साखर कारखाने अवलंबून आहेत. त्यामुळं उजनी धरण १०० टक्के भरणे सर्वांसाठीच खूप महत्वाचे आहे.

उजनी धरण हे शेतकऱ्यांच्या दृष्टीनं अत्यंत महत्वाचं - उजनी धरण हे शेतकऱ्यांच्या दृष्टीनं अत्यंत महत्वाचं असं धरण आहे. कारण या धरणाच्या पाण्यावर सोलापूर जिल्ह्यासह पुणे जिल्ह्यातील मोठं शेतीचं क्षेत्र बागायती आहे. त्यामुळं उजनीच्या पाण्याचं महत्वं मोठं आहे. मात्र, मागील वर्षी उजनी धरण हे ६० टक्केच भरलं होतं. त्यामुळं ऐन उन्हाळ्यात ज्यावेळी शेतकऱ्यांच्या पिकांना पाण्याची गरज असते, त्यावेळी पिकांना पाणी मिळालं नाही. त्यामुळं शेतकऱ्यांची हातची पिकं वाया गेली. यावर्षी मात्र, हवामान विभागानं । **पान २ वर**

## भारताच्या हॉकी संघाने ऑस्ट्रेलियाला पराभूत करत रचला इतिहास



नवी दिल्ली : पॅरिस ऑलिम्पिक २०२४ मध्ये भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात आज म्हणजेच २ ऑगस्टला हॉकी सामना खेळवला गेला. हरमनप्रीत सिंगच्या नेतृत्त्वाखालील भारतीय हॉकी संघाने हा सामना जिंकला आहे. हा विजय भारतीय संघासाठी हॉकीमध्ये खूप महत्त्वाचा होता. टीम इंडिया हॉकीमध्ये सातत्याने चमकदार कामगिरी करत आहे. हरमनचे दोन गोल आणि अभिषेकच्या एक गोलसह भारताने हा सामना ३-२ अशा फरकाने जिंकला. भारत आणि ऑस्ट्रेलिया हे दोघेही ऑलिम्पिक २०२४ च्या उपांत्यपूर्व फेरीत पोहोचले आहेत, पण या विजयाने भारतीय संघाचे मनोबल उंचावले आहे.

भारत-ऑस्ट्रेलिया संघांमध्ये खेळल्या गेलेल्या या सामन्यात भारतीय हॉकी संघाने सुरुवातीपासूनच ऑस्ट्रेलियावर वर्चस्व गाजवले. भारताकडून अभिषेकने एक आणि हरमनप्रीत सिंगने दोन गोल केले, तर ऑस्ट्रेलियाकडून थॉमस क्रेग आणि ब्लेक गोवर्सने गोल केले. या सामन्यातील विजयासह भारतीय हॉकी संघ ब गटातील गुणतालिकेत दुसऱ्या स्थानावर पोहोचला आहे. भारताचे आता ५ सामन्यांतून १० गुण झाले आहेत. तर ऑस्ट्रेलियन संघ ५ सामन्यांत ९ गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहे. भारताने ५२ वर्षांनंतर ऑलिम्पिकमध्ये हॉकी सामन्यात ऑस्ट्रेलियाचा पराभव केला. टीम इंडियाने १९७२ च्या ऑलिम्पिकमध्ये ऑस्ट्रेलियाचा शेवटचा पराभव केला होता. यासह, भारतीय संघ सलग दुसऱ्या ऑलिम्पिक पदकाच्या शोधात मोठी कामगिरी करत आहे. आतापर्यंत त्यांना केवळ बेल्जियमविरुद्ध पराभव पत्करावा लागला आहे. याशिवाय संघाने सातत्याने चांगली कामगिरी । **पान २ वर**

# समाजातील सर्व घटकांच्या विकासासाठी राज्य शासन कार्यरत : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

नागपूर :राज्य शासनाने महिला केंद्रीत धोरण आखले असून त्याची अंमलबजावणी सुरू आहे. युवकांच्या हाताला काम देण्यासाठी 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना' ही महत्त्वाकांक्षी योजना आणली आहे. सर्व समाज घटकांच्या विकासासाठी राज्यशासन कार्यरत असून निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी करत जनहिताचे निर्णय गतीने घेण्यात येणार असल्याचे प्रतिपादन, उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.येथील कविवर्य सुरेश भट सभागृहात जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाकडून आयोजित कार्यक्रमामध्ये उपमुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या हस्ते आभासी पद्धतीने जिल्ह्यातील तीन नवनिर्मित आरोग्य केंद्रांच्या इमारती व निवासस्थानांचे लोकार्पण झाले. तसेच 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने'तील लाभार्थ्यांना नियुक्तीपत्रे आणि आशा



सेविकांना त्यांच्या हस्ते अँड्रॉईड मोबाईल वितरण करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष मुक्ता कोकड्डे, खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार सर्वश्री चंद्रशेखर बावनकुळे, आशिष जयस्वाल, परिणय फुके, अनिल देशमुख, अभिजीत वंजारी, टेकचंद सावरकर, सुधाकर आडबाले, प्रवीण दटके, कृपाल तुमाने, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौम्या शर्मा आदी उपस्थित होते.उपमुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, माता व बालमृत्यू तसेच कुपोषण रोखण्यासाठी आशा सेविका मोलाचे योगदान देत आहेत. केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना जनतेपर्यंत पोहचविण्याची जबाबदारीही त्या योग्यरित्या पार पाडत आहेत. त्यांच्या कामामध्ये सुकरता यावी आणि त्यांना विविध नोंदी घेता याव्या, माहितीचे संकलन करता यावे यासाठी जिल्हा खनिज निधीतून त्यांना मोबाईल वितरित करण्यात आले आहे. त्यांच्या मागणीनुसार येत्या काळात या मोबाईलसाठी जिल्हा खनिज निधीतून वार्षिक रिचार्जसाठी निधी देण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. आशा सेविकांच्या मानधनात । **पान २ वर**

## उजनीचे ओव्हरफ्लो होणारे पाणी एकरुख योजनेच्या माध्यमातून कुरनूर धरणात सोडा

### माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांची मागणी



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट / हणमंत घोदेः सध्या पुणे जिल्ह्यात पावसाची समाधानकारक हजेरी असल्याने जिल्ह्याची वरदायिनी ठरलेले उजनी धरण लवकरच पूर्ण क्षमतेने भरणार आहे.परंतु अक्कलकोट तालुक्यासाठी वरदायिनी ठरलेले कुरनुर धरण मात्र भरले नाही.ही विसंगत परिस्थिती लक्षात घेऊन भविष्यात उजनीतील ओव्हरफ्लो होणारे पाणी एकरुख योजनेच्या माध्यमातून तात्काळ कुरनूर धरणात सोडण्यासंदर्भात आवश्यक कार्यवाही करा अशा प्रकारची मागणी माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांच्या शिष्टमंडळाकडून जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्याकडे करण्यात आली . त्यावेळी मा पंचायत समिती सदस्य धनेश आचलारे, सिद्धार्थ गायकवाड,आप्पा हलसगे, चिंकलंडे उपस्थित होते.

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेत जिल्ह्यातील जास्तीत जास्त आस्थापनानी सहभागी व्हावे..

***जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्याकडून सर्व शासकीय निमशासकीय कार्यालयानी त्यांच्या आस्थापना मधील पाच टक्के मनुष्यबळ या योजनेअंतर्गत भरण्याचे निर्देश *या योजनेअंतर्गत अजय राजेंद्र वायदंडे व समीर अरुण काटीकर या २ युवा प्रशिक्षणार्थीची निवड केली असून या युवा प्रशिक्षणार्थीना जिल्हाधिकारी यांच्या हस्ते आज नियुक्ती पत्रही देण्यात आले**

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः राज्यातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देवून त्यांची नोकरी मिळण्याची क्षमता (एाश्रिलळश्र-ळीं) वाढविण्यासाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना शासनाने हाती घेतली असून या योजनेअंतर्गत रोजगार इच्छुक उमेदवार व रोजगार उपलब्ध करुन देणारे उद्योजक /आस्थापना जोडले जातील. रोजगार इच्छुक उमेदवारांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव प्रशिक्षणातून (इंटर्नशिप) मिळून त्यांची क्षमतावाढ होईल तसेच उद्योजकांना त्यांच्या उद्योगासाठी आवश्यक असणारे मनुष्यबळ कार्य प्रशिक्षण (इंटर्नशिप) द्वारे उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करिता कौशल्य, रोजगार उद्योजकता नाविन्यता कार्यकारी समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी समितीची बैठक घेऊन संबंधीत सदस्यांना या योजनेची अंमलबजावणी उत्तम पध्दतीने करण्याबाबत मार्गदर्शन केले. व निवासी उपजिल्हाधिकारी श्रीमती मनिषा कुंभार यांनी उच्च शिक्षण विभाग यांचेही आयोजित बैठकीत त्यांच्या अधिनस्त कॉलेजमधील उमेदवारांची जास्तीत जास्त नोंदणी या योजनेअंतर्गत करण्याबाबत मार्गदर्शन केले.

दिनांक २४ जुलै २०२४ रोजी जिल्हाधिकारी यांनी सोलापूर जिल्हयातील सर्व खाजगी आस्थापना/उद्योजक, एमआयडीसी असोसिएशचे अध्यक्ष यांना या योजनेत जिल्हयातील जास्तीत जास्त उद्योजकांना सहभागी होण्याकरिता सूचित करण्यात आले. सर्वांनी याबाबत सहकार्य करण्याची व सकारात्मक भूमिका घेण्याची हमी जिल्हाधिकारी महोदयांना बैठकीत दिली. दिनांक २७ जुलै २०२४ रोजी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली सोलापूर जिल्हयातील सर्व शासकिय/ निमशासकिय / स्थानिक स्वराज्य संस्था/महामंडळे यांची व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे आयोजित बैठकीत सर्व कार्यालयांना त्यांच्याही कार्यालयात सदर योजनेअंतर्गत मंजूर पदांच्या ५% मनुष्यबळ भरणेकरिता सूचित केले.

शासकीय कार्यालयांची या योजनेअंतर्गत रिक्तपदे भरण्याकरिताची कार्यवाही ही प्रगतीपथावर असून महसूल पंधरवड्यात जिल्हयातील विविध शासकीय कार्यालयांमार्फत १० ते १५ ऑगस्ट दरम्यान युवा कार्यप्रशिक्षण योजनेअंतर्गत युवांना नियुक्त्या देण्याबाबत जिल्हाधिकारी यांनी सूचित केले आहे. निवासी उपजिल्हाधिकारी यांनी संभाजीराव गरड कॉलेज मोहोळ येथे उमेदवारांना आज दिनांक ०२ ऑगस्ट २०२४ रोजी महसूल । **पान २ वर**

# सामान्य पत्रकारांकडेही मतांचे गठ्ठे आहेत : वसंत मुंडे

## पत्रकार संवाद यात्रेच्या पहिल्या टप्प्याचा शिर्डी येथे समारोप

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

शिर्डी/प्रतिनिधीः पत्रकार समाजाच्या प्रश्नांसाठी व्यवस्थेशी झगडत राहितो. आपल्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करतो . मात्र आता न्याय मागण्यासाठी महाराष्ट्रातील तमाम पत्रकारांचा एकत्रित बुलंद आवाज करण्याचा प्रयत्न करणार आहोत. सरकारने संवेदनशील होऊन पत्रकारांना न्याय द्यावा. अन्यथा प्रकारांकडे लेखणीसोबतच मतांची देखील ताकद आहे. एका मतदारसंघात संघात वीस पत्रकारांनी वैयक्तीक पातळीवर । **पान २ वर**



**नाशिकच्या जिल्हा शाखेकडून संवाद यात्रेतील सहभागी पत्रकारांचा सन्मान**

पत्रकार संघाचे नाशिक जिल्हाध्यक्ष दिलीप कोठावदे आणि ज्येष्ठ पत्रकार नरेंद्र पाटील तसेच राम बंधु परिवार नाशिक यांच्या वतीने पत्रकार संवाद यात्रेमध्ये नागपूर ते शिर्डी दरम्यान जे जे सहभागी झाले त्या सर्वांचा सर्वांना गीतेच्या ग्रंथासह मिठाई भेट देऊन स्वागत करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## पत्रकारांच्या प्रश्नांसाठी विविध पत्रकार संघटनेने एका छताखाली आले पाहिजे - किसन भाऊ हासे

पत्रकारांच्या विविध संघटना आहेत.या सर्व संघटनांनी महाराष्ट्रात पहिल्यांदाच वसंत मुंडे यांच्या नेतृत्वाखाली पत्रकारांच्या प्रश्नांचा जागर करत निघालेल्या संवाद पत्रकार यात्रेच्या समारोप कार्यक्रमास मुंबई येथे उपस्थित राहून पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी जाहीर पाठिंबा देऊन सरकारला एकजुटीचे दर्शन घडवत न्याय हक्काच्या मागण्या मान्य करण्यास भाग पाडले पाहिजे असे मत व्यक्त केले. या भूमिकेतून आज मी संपादक व पत्रकार सेवा संघ महाराष्ट्र मुंबईचा जाहीर पाठिंबा शिर्डीतील या संवाद यात्रेतील पहिल्या टप्प्यातील समारोपामध्ये देत असल्याचे जाहीर करून पत्रकारांच्या हितसंबंधातील काही आणखीन मागण्यांचे निवेदन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्याकडे दिले.

## संपादकीय

### शिक्षा व्हावी..

संपूर्ण महाराष्ट्राची या घटनांमुळे मान लाजेने खाली गेली आहे. बेलापूरमधील अक्षता म्हात्रे या विवाहितेवर अत्याचार करून तिची हत्या आणि उरणमधील यशश्री शिंदे हिची निर्घृण हत्या यामुळे राज्यातील महिला किती सुरक्षित आहेत हे लक्षात येते. काही दिवसांपासून अक्षता यांना न्याय मिळावा म्हणून स्थानिकांकडून पोलीस आयुक्तांना निवेदन देणे, निषेध करणे, मोर्चा काढणे सुरू होते. असे असताना यशश्री शिंदे या २२ वर्षीय युवतीची निर्घृण हत्या झाल्याचे उघडकीस आले आणि नवी मुंबई पुन्हा हादरली. नवी मुंबईत गुन्हेगारी घटना नवीन नाहीत, परंतु आता अत्याचार करून निर्घृण हत्या होत आहेत ही सर्वाधिक गंभीर बाब आहे. तीन महिन्यांपूर्वी उरण तालुक्यातील चिरनेरमध्ये एका युवतीचे प्रेत आढळले होते. पूनम क्षीरसागर असे या युवतीचे नाव होते. ही युवती मानखुर्दची होती आणि एका टॅक्सीचालकाने हिची हत्या करून चिरनेरमध्ये प्रेत टाकून दिले होते. त्यानंतर आठवडाभरातच पोलिसांनी टॅक्सीचालक निजामुद्दीन अली याला अटक केली होती. त्यानंतर अक्षता या विवाहितेची हत्या तर समाजासाठी चिंतेची बाब ठरली आहे. अक्षता म्हात्रे यांच्या हत्येनंतर २७ जुलै रोजी उरणमध्ये यशश्री शिंदे या २२ वर्षांच्या युवतीची अत्यंत थंड डोक्याने निर्घृण हत्या करण्यात आली. कुणाचीही हत्या करणे सोपे झाले आहे. कायद्याचा धाक राहिला नसल्याचे या प्रकरणातून दिसून येते. या दोन्ही घटनांवरून नवी मुंबई तसेच रायगड जिल्ह्यातील  माजमन ढवळून निघाले आहे. ठिकठिकाणी निषेध मोर्चे, आक्रोश मोर्चे काढले जात आहेत. आरोपींना फाशी देण्याची मागणी होत आहे. या दोन्ही घटना ताज्या असतानाच दोन दिवसांपूर्वी उरणजवळील न्हावे गावात आणखी एक घटना घडली. प्रीतम म्हात्रे या विकृत तरुणाने एकतर्फी प्रेमातून एका युवतीवर हल्ला केला. २६ जुलै रोजी या युवतीवर त्याने लोखंडी सळईने हल्ला केला. यात ही तरुणी गंभीर जखमी असून तिच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. या तिन्ही घटना नक्कीच विचार करायला लावणाऱ्या आहेत. राज्यात सध्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू करण्यात आली आहे. महिलांना आर्थिक मदत करणारी ही योजना आहे, पण या लाडक्या बहिणींची सुरक्षितता तितकीच महत्त्वाची आहे. भयंकर गुन्हेगारीच्या घटना ज्या वेगाने घडत आहेत याचा जनता म्हणून तुम्हाला-आम्हाला, सरकारला आणि पोलीस यंत्रणेला खूप गांभीर्याने विचार करावा लागेल. कारण असे प्रसंग कुणावरही येऊ शकतात.

**समाजाच्या दृष्टिकोनातून समाजाचा मान सन्मान उचवणारी गोष्ट म्हणजे अक्कलकोट तालुक्यामधून बौध्द महिला प्रथमच काजीकणबस गावातील PSI दिव्या रामराज कांबळे (चंदनशिवे) यांची पोलीस उपनिरीक्षक (PSI) पदी निवड झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन**

## काजीकणबस गावातील पी.एस.आय दिव्या कांबळे यांची पोलीस उपनिरीक्षकपदी निवड




माणसाकडे जिद्द चिकाटी , मेहनत ,कष्ट , लहानपणापासून वडिलांची छाया हरपली असताना सुद्धा घरातील दोन भावाडं आई या छोट्याशा परिवारा मधून आलेल्या दिव्या ताई परिस्थितीवर प्रत्येक गोष्टीमध्ये मात करत आली स्वतःच्या मनामध्ये ध्येय आई वडील भावाने दिलेले संस्कार आणि पती ने दिलेली सर्वात मोठी संधी या सर्व गोष्टीच्या बळावरती जीवनामध्ये प्रत्येक गोष्टीचा त्याग करून नुकतेच नविन वैवाहिक जीवनामध्ये सुखी संसार करू शकले असती चुल आणि मूल या गोष्टींमध्ये बंदिस्त राहून आपल्या आपत्यांना जन्म दिला असता पण ह्या सर्व गोष्टी बाजूला करून घरातील सासू आई-वडील समाज परिवारामधील अनेक लोक काय बोलतील या गोष्टीकडे दुर्लक्ष करून जीवनामध्ये खूप मोठा त्याग करून पतीने आपल्यावर दाखवलेला विश्र्वासाला सार्थक करून दाखवणारी पहिली अक्कलकोट तालुक्यामधून महिला बौद्ध पीएसआय माझ्या माहितीप्रमाणे होऊन दाखवल्या ही खूप अभिमानाची गोष्ट आणि समाजाचा मान सन्मान उंचावणारी गोष्ट आहे करत असताना अनेक वाईट  प्रसंगांना सुद्धा सामोरे जावे लागलं आणि यामध्ये सर्वात मोठा वाटा सिंहाचा वाटा म्हणजे त्यांचे पती मुंबई पोलीस रामराज कांबळे यांचाच आहे विवाह झाल्यानंतर एखाद्या स्त्रीचं फारच स्वप्न मोठं काही नसतं कुठे असलं तरी त्यांना पतीने न दिलेल्या स्वातंत्र्यामुळे ते स्वप्न बंदीस्त केले जाते पण रामराज कांबळे यांने आपल्या पत्नीला पाहिजे ते परिपूर्णपणे स्वातंत्र्य दिले पाहिजे त्या सुख सुविधा दिल्या घरामध्ये सर्व गोष्टीची परिस्थिती असताना सुद्धा घरामध्ये फक्त चझडउ चे पुस्तक , वाचनाची आवड बातम्या, जनरल नॉलेज आशा गोष्टी वरती चर्चा सुसंवाद , अशा  सर्व गोष्टी पतीच्या माध्यमातून झाल्या आणि या सर्व गोष्टीची जाणीव दिव्या ताईंना होती लहानपणापासूनच जिद्द चिकाटी , तुळजापूर तालुक्यातील होनाळा , गावात आपलं प्राथमिक शिक्षण पूर्ण झाला आणदुर उच्च माध्यमिक महाविद्यालय तुळजापूर तालुका या ठिकाणी हॉस्टेलला राहून पंधरावी पर्यंत शिक्षण पूर्ण झाले दोन जुळे बंधू एक आर्मी तर दुसरा इंजिनियर आणि आई असा हा छोटासा परिवार अशा छोट्याशा परिवारामधून विवाह बंधनात बंदिस्त झाल्या तरीसुद्धा जिद्द चिकाटी आणि ध्येय या गोष्टी स्वतःच्या मनापासून कधीच विसरू दिल्या नाहीत लहानपणापासून शाळेमध्ये टायलेंट परिस्थिती जाणीव अशा सर्व गोष्टी त्यांना घडवण्यासाठी होत्या म्हणून म्हणून ते आज घडल्या ह्या सर्व गोष्टी घडण्यासाठी सुद्धा कित्येक दिवस विवाह होऊन हि प्रत्येक स्त्रीला मातृत्व प्राप्त होण्याची इच्छा स्वप्न असतात तु सुध्दा त्याग कराव्या लागल्या कित्येक वर्षे त्या जोडप्या नी त्याग सहजा सहजी प्रत्येक स्त्रियांना प्रत्येक पुरुषांना जमत असं मुळींच नाही ते फक्त बोटावर मोजण्या इतकेच लोक असतात त्यापैकी हे दोघे जण पती पत्नी होते यशापर्यंत पोहोचण्यासाठी अनेक संकटांना सामोरे जाऊन खूप उंच भरारी घेण्यासाठी हा सर्व प्रंपच चालु होता कोण काय बोलेल या गोष्टीकडे दुर्लक्ष करून फक्त संघर्ष चालु होता शिक्षणाची गोडी निर्माण होतीच त्या सर्व गोष्टीच्या जीवावरती जीवनामध्ये सफल होता येते त्याचं उत्तम उदाहरण म्हणजे दिव्या ताई लहानपणापासून पाहिलेला स्वप्न खरं करून दाखवले आहे जयंतीच्या निमित्ताने समाजातील चांगल्या उच्च पदावर नोकरदार यांचा सत्कार अक्कलकोट तालुक्यातील झडख निलेश भागव सर यांच्या हस्ते करण्यात आला होता त्यामध्ये मुंबई पोलीस रामराज कांबळे यांच्या अनुपस्थितीत त्यांची पत्नी दिव्या कांबळे यांचा सुद्धा सत्कार करण्यात आला होता त्यावेळेस सत्कार करत असताना ह+९१ ८१०८४ ३५४५४ळ सर , मी तुम्हाला आवर्जून उल्लेख केला होता हे मुंबई पोलीस रामराज कांबळे यांची पत्नी आहे ते एमपीएससी यूपीएससी तयारी करतात झीळ च्या सध्या रेज मध्ये आहेत आणि काल त्या पीएसआय ची परिक्षा उत्तीर्ण झालेल्या  हे खूप अभिमानाची गोष्ट ग्रामीण भागातील लोकांसाठी आणि ग्रामीण भागातून आलेला प्रत्येक विद्यार्थ्यासाठी आहे कोणता ही विद्यार्थीनीं इथपर्यंत पोहचणे खूप कठीण खडतर प्रवास असतो पण तो रस्ता पार करून यशस्वी होतात यासाठी जिद्द चिकाटी कष्ट अभ्यास आणि मोनबल वाढवणाऱ्या कुंटबाची पण खुप गरज असते हे तितकेच खरं आहे  आणि या सर्व झालेल्या गोष्टीतून एकच  सांगावेसे वाटतंय की जिथे संधी मिळते  तिथे संधीचं सोनं करून दाखवण्याची क्षमता आहे आलेला संधीचा उपयोग करता आलं पाहिजे ध्येयवादी माणसं आपल्या ध्येय पर्यंत पोहचतात हे परत एकदा सिध्द झाले ताई तुम्ही केलेला संघर्षा बद्दल जेवढे कौतुक करावं तेवढं कमीच आहे यापुढे सुद्धा तुम्ही  आपल्या पतीचं गावचं समाजाचा  आणि तालुक्याचा असंच नाव रोशन करत राहो हिच तुम्हाला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा सदिच्छा देतोय आणि अजून तुमच्या प्रेरणादायी प्रवास मुळे आपल्या गावातून अनेक विद्यार्थी विद्यार्थिनी घडतील आणि तुम्ही घडवण्याचं काम कराल योग्य ते मार्गदर्शन कराल यात काहीही शंका नाही पुढील वाटचालीस खूप खूप शुभेच्छा आणि झडळ ची परिक्षा उत्तीर्ण झालेल्या बद्दल यश प्राप्त करून दिल्याबद्दल अभिनंदन समाजाचे नाव रोशन करणारी कौतुक स्पदांची  उंच भरारी आहे

जय हिंद जय भारत

**-अविनाश सोपान गायकवाड,**

पान १ वरुन

## मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण

पंधरवडा अंतर्गत नोंदणी करण्याबाबत मार्गदर्शन केलेले असून उमदेवारांनी त्यांच्या मित्र परिवारांमध्येही नोंदणी करण्याचे आवाहन केले. त्याचबरोबर महसूल पंधरवडा योजनेअंतर्गत सर्व तालुक्यात तहसिलदार यांचेमार्फत सदर योजनेची प्रचार व प्रसिध्दी ही मोठ्या प्रमाणावर करण्यात येत आहे.

दिनांक ०२ ऑगस्ट २०२४ रोजी महसूल पंधरवडयाचे औचित्य साधून जिल्हाधिकारी कार्यालयात सदर योजनेअंतर्गत अजय राजेंद्र वायदंडे व समीर अरुण काटीकर या २ युवा प्रशिक्षणार्थीची निवड करण्यात आलेली असून या दोन्ही युवा प्रशिक्षणार्थीना  जिल्हाधिकारी यांच्या हस्ते आज नियुक्ती पत्रही देण्यात आले, अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार यांनी दिली आहे.

## सामान्य पत्रकारांकडेही मतांचे

प्रत्येकीती  पाचशे मत  दिली तर राज्यात तीस लाख मतांचा गठ्ठा होईल. मग ही मत कोणी बघणार की नाही? पत्रकारांच्या मतांची गरज आहे की नाही?असा प्रश्न करत सरकारने पत्रकारांच्या मागण्यांसाठी तात्काळ निर्णय घ्यावा असे आवाहन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष प्रमुख वसंत मुंडे यांनी केले .

शिर्डी येथे २८ जुलै २०२४ रोजी दीक्षाभूमी ते नागपूर पत्रकार संवाद यात्रेच्या पहिल्या टप्प्याचा समारोप झाला.नागपूर वर्धा ,अमरावती, अकोला, धुळे,जळगाव, शेगाव या मार्गे श्रीक्षेत्र शिर्डी येथे २ ऑगस्ट रोजी दाखल झाली. यावेळी स्थानिक पत्रकारांनी मोठ्या उत्साहात स्वागत केले.यावेळी प्रदेशाध्यक्ष श्री वसंतराव मुंडे यांच्यासह प्रदेश सरचिटणीस विश्र्वासराव आरोटे, प्रदेश कार्याध्यक्ष प्रवीण सपकाळे, मराठवाडा विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी,मुंबई विभागीय अध्यक्ष नितीन शिंदे, दक्षिण शिर्डी जिल्हाध्यक्ष दत्ता घाडगे,उत्तर जिल्हाध्यक्ष सोमनाथ काळे, उत्तर विभागीय सचिव अनिल रहाणे उपस्थित होते.संपादक व पत्रकार सेवा संघ महाराष्ट्र मुंबईचे संस्थापक अध्यक्ष किसन भाऊ हासे व मनसे पदाधिकारी यांची पाठिंबा दिला.यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना  प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे म्हणाले की,साई बाबानी श्रद्धा आणि सबुरीची शिकवण जगाला दिली. अशा संत नगरीत यात्रेचा समारोप होत आहे. नागपूर येथील दीक्षाभूमी येथून संवाद यात्रेला प्रारंभ झाला. त्यावेळी मला मनात थोडी सांशकता होती.मात्र जसा संवाद यात्रेचा प्रवास सुरू झाला तसे वर्धा, अमरावती, अकोला, शेगाव, जळगाव, धुळे ते आज शिर्डी या प्रवासा दरम्यान विविध तालुके छोटी छोटी गावे येथील पत्रकारांच्या विविध संघटनांनी उस्फूर्तपणे पाठबळ दिले. एवढेच नव्हे तर विविध लोकप्रतिनिधी, विविध पक्षांचे नेते, सामाजिक चळवळीतील कार्यकर्ते,सामान्य जनता यांनी संवाद यात्रेचे स्वतः हून उस्फूर्त स्वागत करत जाहिर पाठिंबा दिला. या भागातून प्रवास करत असताना पत्रकारांनी त्यांच्या वास्तव समस्या जेव्हा समोर मांडल्या तेव्हा मी केवळ २० प्रमुख समस्याना सोबत घेऊन निघालो होतो. आता या मागण्यांमध्ये मुंबईला जाई पर्यंत किती वाढ होईल हे आज सांगू शकत नाही.याचाच अर्थ पत्रकारांच्या समस्या होत्या आणि आहेत.केवळ या समस्यांना वाचा कोणी फोडायची ? जगाचे प्रश्र्न मांडणाऱ्या पत्रकारांना आपलेच प्रश्र्न कुणापुढे मांडावेत ? हा प्रश्र्न पडला होता.हे वास्तव या संवाद यात्रेच्या माध्यमातून समोर येत आहे.आज पर्यंत लोकशाही मार्गाने संविधानिक मार्गाने आम्ही सरकारकडे न्याय हक्काच्या मागण्या मागितल्या.यातील काही मागण्यांना सरकारने न्याय दिला. मात्र त्यामध्ये जाचक अटी टाकल्या. यामुळे त्या सुविधांचा लाभ सुलभपणे होत नाही. आता आमची मागणी एवढीच आहे पत्रकारांना अधीस्वीकृती सहज मिळावी आणि ज्येष्ठ पत्रकारांना वयाच्या साठव्या वर्षीच  तात्काळ शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे सन्मान पेन्शन योजना मिळावी. यासह विविध न्याय मागण्यांना सरकारने २० ऑगस्ट रोजी पत्रकार संवाद यात्रेच्या समारोप कार्यक्रमाच्या व्यासपीठावर येऊन पत्रकार देखील लाडकी बहीण, लाडका भाऊ याप्रमाणे लाडका पत्रकार देखील आहे हे सिद्ध करून पत्रकारांच्या हिताचे निर्णय शासन स्तरावर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री यांनी जाहीर करावेत.  पत्रकारांकडे लेखणी बरोबरच मतांचीही शक्ती आहे याचा विचार सरकारने करावा. पत्रकार व त्यांच्या संपर्कातील मतदार एकत्रित केले तर एक सामान्य पत्रकार वैयक्तिक पातळीवर पाचशे मत देऊ शकतो त्यामुळे एका मतदारसंघात दहा हजार आणि राज्यात तीस लाख मतांचा गठ्ठा होईल मग ही मत पाहिजेत का नाही  ? हे सांगण्याची वेळ आली आहे.यामध्ये आम्हाला कसलेही राजकारण करायचे नाही. तो आमचा पिंड ही नाही. आम्ही आमच्या न्याय हक्कांच्या मागण्यासाठी प्रामाणिकपणे लढत आहोत, एवढीच आमची या संवाद यात्रे मागील प्रमुख भूमिका आहे. असे स्पष्टीकरण  प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी दिले.

यांप्रसंगी पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस विश्र्वासराव आरोटे यांनी ही संवाद यात्रा वंचित पीडित अन्यायग्रस्त पत्रकारांचा आवाज बुलंद करण्यासाठी राज्यभरातून पत्रकारांच्या प्रश्र्नांना उजाळा देत जागर करत निघालेली आहे. सुदैवाने या महाराष्ट्राला दोन मुख्यमंत्री हे संपादक लाभले. यापूर्वी दैनिक सामनाचे संपादक उद्धवराव ठाकरे साहेब हे मुख्यमंत्री होऊन गेले तर विद्यमान मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे हे देखील संपादक असल्याने ते पत्रकारांच्या प्रश्र्नांना या संवाद यात्रेच्या माध्यमातून नक्कीच न्याय देतील. असा विश्र्वास व्यक्त करून वसंत मुंडे यांच्याकडे नेतृत्व दातृत्व आणि कर्तुत्व असल्याने त्यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रातील पत्रकारांना न्याय मिळेल असा विश्र्वास व्यक्त केला. तर पत्रकार संघाचे प्रदेश कार्याध्यक्ष प्रवीण सपकाळे म्हणाले, पत्रकारांच्या प्रश्र्नांची जाण असलेले लाडके नेतृत्व वसंत मुंडे यांच्या रूपाने पत्रकारांना लाभले आहे. पत्रकारांना देखील प्रश्र्न असतात आणि ते सोडवावे लागतात ही भूमिका आता पत्रकारांसह जनसामान्यांना देखील मान्य झाली आहे. हेच संवाद यात्रेचे पहिले यश आहे. त्यामुळे आता ही यात्रा कुठेही थांबणार नाही. पत्रकारांना न्याय हक्क मिळवून दिल्यावरच हा संघर्ष थांबेल असे जाहीर केले. यांप्रसंगी व्यासपीठावरील विविध मान्यवरांनी आपले मत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उत्तर विभागीय सचिव अनिल रहाणे यांनी केले.तर उत्कृष्ट सूत्रसंचालन दत्ता घाडगे, दक्षिण जिल्हाध्यक्ष यांनी केले. कार्यक्रमाचे जाहीर आभार प्रसिद्धी प्रमुख भीमराव वाकचौरे यांनी मानले. पत्रकार संवाद यात्रेतील पहिल्या टप्प्याच्या समारोपात राज्यभरातील पत्रकार आणि पत्रकार प्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्नेह भोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## उजनीची शंभरीकडे वाटचाल,

चांगल्या पावसाचा अंदाज वर्तवला आहे. त्यानुसार सध्या राज्याच्या विविध भागात पाऊस होत आहे. उजनी धरण क्षेत्रात देखील चांगला पाऊस होत आहे. त्यामुळं शेतकरी आनंदी आहेत. दरम्यान, उजनी धरणात मोठ्या प्रमाणात पाणी येण्यासाठी पुणे जिल्ह्यात देखील चांगल्या पावसाची गरज असते. कारण, पुणे जिल्ह्यातील धरणं ओव्हरफ्लो झाल्यानंतर त्या धरणातून पाणी उजनीत सोडले जाते. त्यामुळं क्षमतेनं मोठं असणारं धरण देखील वेगाने भरते. त्यामुळं उजनी धरण लवकर भरण्यासाठी पुणे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पावसाची गरज आहे.

## समाजातील सर्व घटकांच्या ..

भरघोस वाढ करण्यात आली आहे. या महिन्यापासूनच आशा सेविकांना वाढीव मानधन मिळणार असल्याचे श्री.फडणवीस म्हणाले. यासोबतच आशा सेविकांना १० लाखांपर्यंतचे विमा कवच देण्याचा निर्णय घेण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले .

राज्य शासनाने महिला केंद्रीत धोरण आखले आहे. या अंतर्गत 'मुख्यमंत्री -माझी लाडकी बहीण' योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत अडीच कोटी महिलांना दर महिन्याला १५००/- रुपये आर्थिक मदत देण्यात येणार आहे. राज्यात मुलींना प्राथमिक व माध्यमिक शिक्षण मोफत देण्यात येत आहे. नुकतेच राज्य शासनाने मुलींना मोफत उच्च शिक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार शासकीय महाविद्यालयांमध्ये मोफत शिक्षणासह खाजगी महाविद्यालये व शैक्षणिक संस्थांमध्ये ५०७ अभ्यासक्रमासाठी मोफत शिक्षण देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.महिला सन्मान योजनेच्या माध्यमातून एसटी बसच्या तिकिटांमध्ये महिलांना ५०% सुट देण्याचा निर्णय घेतला व त्याची प्रभावी अंमलबजावणीही होत आहे. मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेच्या माध्यमातून महिलांना तीन सिलेंडर मोफत पुनर्भरण करून देण्याची महत्वाकांक्षी योजना आणली आहे.

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेद्वारे राज्यातील १० लाख तरुणांना प्रशिक्षण देण्यात येणार असून महिन्याला दहा हजार रुपयांचे विद्यावेतन देण्यात येणार आहे. प्रशिक्षण कालावधीनंतर त्यांना प्रशिक्षण घेत असलेल्या कंपनी किंवा आस्थापनेमध्ये नोकरी मिळू शकेल. याशिवाय शासनाच्या विविध योजना व कार्यक्रमांतर्गत त्यांना स्वयंरोजगारासाठी स्वस्त दरात कर्ज उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

गोर-गरीब जनतेला उत्तम आरोग्यसेवा उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने पुढाकार घेतला आहे. मुख्यमंत्री आरोग्य कक्षाद्वारे गोरगरिबांना देण्यात येणाऱ्या सोयी -सुविधांविषयी त्यांनी माहिती दिली. महात्मा फुले जन आरोग्य योजना आता राज्यातील सर्वच नागरिकांना लागू करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत पाच लाखापर्यंतचे उपचार मोफत करण्याची सोय करुन देण्यात आली आहे.तत्पूर्वी, उपमुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या हस्ते आभासी पद्धतीने काटोल तालुक्यातील झिल्पा आणि भोरगड तसेच पारशिवनी तालुक्यातील घाटपेंढरी येथील नवनिर्मित आरोग्य केंद्रांचे लोकार्पण करण्यात आले. नागपूर जिल्हा परिषदेद्वारे मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेसाठी निवड करण्यात आलेल्या उमेदवारांपैकी पाच उमेदवारांना प्रातिनिधिकरित्या नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली. प्रातिनिधिक स्वरुपात जिल्ह्यातील १३० आशा सेविकांना अँड्रॉईड मोबाईल वितरण करण्यात आले.जिल्हा परिषद अध्यक्ष मुक्ता कोकड्डे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. मुख्य कार्यकारी अधिकारी सौम्या शर्मा यांनी प्रास्ताविक केले, रेणुका देशकर यांनी सुत्रसंचालन तर जिल्हा आरोग्य अधिकारी राजकुमार गहलोत यांनी आभार मानले.

## भारताच्या हॉकी संघाने ऑस्ट्रेलियाला

केली आहे. भारताने ऑलिम्पिकमधील आपल्या मोहिमेला न्यूझीलंडविरुद्धच्या विजयाने सुरुवात केली. त्यानंतर भारताने अर्जेंटिनाविरुद्ध सामना अनिर्णित राहिला. शेवटपर्यंत अर्जेंटिना १-० ने पुढे होती. १.४५ मिनिट बाकी असताना कर्णधार हरमनप्रीतने गोल करत सामना बरोबरीत आणला.

अर्जेंटिनाच्या सामन्यानंतर संघाने आयर्लंडचा पराभव केला. बेल्जियमच्या सामन्यातही भारतीय संघाने संपूर्ण सामन्यात आपला दबदबा कायम राखला असला तरी अखेरच्या क्षणांमध्ये त्यांना सामना १-२ असा गमवावा लागला होता. तर आता संघाने ऑस्ट्रेलियाविरुद्ध सामना जिंकला.दिल्ली कॉमनवेल्थ गेम्स २०१० च्या फायनलमध्ये ८-० आणि बर्मिंगहॅम कॉमनवेल्थ गेम्सच्या फायनलमध्ये ७-० अशा पराभवानंतर झालेल्या भारतीय हॉकी चाहत्यांच्या जखमा या विजयाने नक्कीच भरल्या असतील. या सामन्यापूर्वी भारताने ऑलिम्पिकमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध ११ पैकी फक्त ३ सामने जिंकले होते (१९६० रोम उपांत्यपूर्व फेरी, १९६४ टोकियो उपांत्य फेरी आणि १९७२ म्युनिक गट सामना) तर ऑस्ट्रेलियाने सहा जिंकले होते आणि दोन अनिर्णित राहिले होते.

## मनपा डिजिटल स्कूल २८ नंबर मध्ये भातात आळी..

सोलापूर/प्रतिनिधी:सोलापूर येथील मनपा डिजिटल स्कूल २८ नंबर सुंदरम नगर येथील शाळेत विद्यार्थी भात खात असताना त्यामध्ये अळी असून मुले हे भात कसे खहावे याकडे मुख्याध्यापक शिक्षक वर्ग व शिक्षण अधिकारी यांनी लक्ष द्यावे असे वारंवार होत आहे. तरी देखील या अगोदर भातामध्ये झुरळ सुद्धा पडलेले होते आता सुद्धा भातामध्ये आळी निघाली असे कळताच नागरिक शाळेकडे धाव घेत होते तरी श्री मुख्याध्यापक सुतार सरांनी आपण किचन शेडकडे जाऊया असे आश्र्वासन नागरिकांना दिले एकीकडे पुरस्कार स्वीकारते तर मुलांना भारतामध्ये आळी खाऊ घालते असे का  पालकांचे म्हणणे आहे तर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिक्षणाधिकारी कादर शेख साहेब यांनी लक्ष द्यावे   असे पालकाचे म्हणणे आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# थेट द्वितीय वर्ष एमबीए प्रवेशासाठी ऑनलाइन कॅप रजिस्ट्रेशन प्रकियेस मुदतवाढ

## स्वेरीत ऑनलाईन फॉर्म भरण्याची मोफत सुविधा उपलब्ध

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः 'शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता थेट द्वितीय वर्ष एमबीए (पदव्युत्तर पदवी) च्या प्रवेशासाठी ऑनलाईन कॅप रजिस्ट्रेशन प्रक्रियेला मुदतवाढ मिळाली असून आता ही प्रकिया बुधवार, दि.०७ ऑगस्ट २०२४ पर्यंत चालणार आहे. राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून स्वेरी अभियांत्रिकीच्या एमबीए विभागास सुविधा केन्द्र (एफ.सी. ६२२०) म्हणून मान्यताही मिळालेली आहे. ही ऑनलाईन रजिस्ट्रेशनची प्रक्रिया बुधवार, दि.०७ ऑगस्ट २०२४, सायं. ०५ वाजेपर्यंत चालणार आहे.' अशी माहिती स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांनी दिली.




महाराष्ट्र शासनाच्या राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या https://cetcell.mahacet.org या संकेतस्थळावर या प्रक्रियेबाबत सविस्तर माहिती दिली आहे. स्वेरी अभियांत्रिकीच्या एमबीए (पदव्युत्तर पदवी) मध्ये ऑनलाईन रजिस्ट्रेशन करण्याची मोफत सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. ऑनलाईन (कॅप) रजिस्ट्रेशनची ही प्रक्रिया गुरुवार, दि.२५ जुलै २०२४ ते बुधवार, दि.०७ ऑगस्ट, २०२४ रोजी सायं. ०५ वाजेपर्यंत चालणार असून यामध्ये ऑनलाईन रजिस्ट्रेशन करणे, स्कॅन केलेली कागदपत्रे अपलोड करणे, कागदपत्रांची पडताळणी करणे आणि कन्फर्मेशन करणे आदी प्रक्रिया चालतील. यापूर्वी ही मुदत गुरुवार, दि.२५ जुलै, २०२४ ते गुरुवार, दि.०२ ऑगस्ट, २०२४ पर्यंत होती. यामध्ये ऑनलाईन प्रवेश अर्ज भरणे, कागदपत्रे पडताळणी व अर्ज निश्र्चिती आदी प्रक्रिया सुरू झाली होती पण या कालावधीत प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या अनेक विद्यार्थांना प्रशासनाकडून कागदपत्रे व प्रमाणपत्रे उपलब्ध झाली नाहीत. अथवा तांत्रिक बाबींच्या अडचणी निर्माण झाल्या. ही बाब लक्षात आल्यामुळे आता या प्रक्रियेला मुदतवाढ मिळाली असून विद्यार्थ्यांना आता रजिस्ट्रेशन प्रक्रिया बुधवार, दि.०७ ऑगस्ट २०२४ रोजी सायं. ०५ वाजेपर्यंत तर कन्फर्मेशन प्रक्रिया गुरुवार, दि.०८ ऑगस्ट २०२४ रोजी सायं. ०५ पर्यंत करता येणार आहे. रजिस्ट्रेशन करण्यासासाठी विद्यार्थ्यांनी आपल्या प्रवर्गानुसार असलेली सर्व मूळ कागदपत्रे सोबत आणावीत. प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर कागदपत्रांची पडताळणी व कन्फर्मेशन करण्यासाठी प्रत्यक्ष महाविद्यालयात उपस्थित राहणे आवश्यक आहे. प्रवेश प्रक्रियेच्या रजिस्ट्रेशन व कन्फर्मेशन नंतर अंतिम गुणवत्ता यादी प्रसिद्ध होणे, प्रथम, द्वितीय व तृतीय अशा तीन फेरीसाठी ऑप्शन फॉर्म भरणे आदी प्रक्रिया होतील. थेट द्वितीय वर्ष एमबीए (पदव्युत्तर पदवी)च्या प्रवेशाचा लाभ बीटेक, बीबीए व बीएमएस (चार वर्ष पदवी असलेल्या) या शाखेतून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना घेता येणार आहे. थेट द्वितीय वर्ष एमबीए (पदव्युत्तर पदवी) च्या प्रवेशासाठी प्रवेश प्रक्रियेचे अधिष्ठाता प्रा.करण पाटील (मोबा.नं.-९५९५९२११५४) व प्रा. कोमल कोंडूभैरी (मोबा.नं.-८६३७७९६६९३) या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. प्रवेशासंदर्भातील प्रक्रियेत होणाऱ्या संभाव्य चुका टाळण्यासाठी पालक व विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष महाविद्यालयात येऊन आपला अर्ज भरावा व कन्फर्मेशन करून घ्यावे.' असे आवाहन करण्यात आले आहे.

# रेणुका कॉलेज ऑफ एज्युकेशन येथे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांची जयंती साजरी

**दैनिक यशसिध्दि न्यूज**




रेणापूर/सुधाकर रणदिवे : रेणुका कॉलेज ऑफ एज्युकेशन रेणापूर येथे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांची जयंती व पुण्यतिथी साजरी करण्यात आली.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. उमेश रणदिवे उपस्थित होते, तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून डॉ हिरकन शेटकर यांनी काम पाहिले.यावेळी प्राचार्य डॉ कैलास मोटे, प्रा शशिकांत चिलरगे ,प्रा रतन लहाने ,प्रा रमाकांत गायकवाड ,राधिका माने मॅडम, मनीषा लातूरकर , प्रा .उत्तम दुधभाते,प्रा तक्षशिला जावळे,प्रा. भगवान अंकुश ,चंद्रकांत आडे उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन छात्र अध्यापिका कु . तय्यबा शेख यांनी केले तर आभार प्रदर्शन कु, गिताश्री कलमे यांनी केले.

# बहुजन हिताय वसतीगृह येथे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती साजरी

**दैनिक यशसिध्दि न्यूज**



वागदरी /एस.के.गायकवाडः उमरगा जिल्हा धाराशिव येथील बहुजन हिताय वसतीगृहात साहित्य सम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती मोठ्या उत्साहात विविध उपक्रमाने साजरी करण्यात आली. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना मुख्याध्यापक वाघमारे सर म्हणाले की साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या सर्व पुस्तकातून व समग्र जीवनातून आपनास प्रेरणा मिळते तेंव्हा त्यांच्या विचारांचा आदर्श समोर ठेवून आपण आपलं शैक्षणिक व सामाजिक जिवन व्यतीत करणे ही काळाची गरज आहे. प्रारंभी डॉ.बाबासाहेब आंबेडकर व साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमांचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी वसतिगृहातील ऋतिक शिवशरणे इ.६ वी,चेतन गायकवाड ६ वी, सुबुद्ध शिवशरणे ८ वी, आदित्य ककेरे ५ वी, प्रेम सास्तुरे ६वी, आनंद,जोगदंड, ९ वी, संस्कार पवार ९ वी, वेदांत जोगदंड ८ वी, शुभम चाबुकस्वार १०वी,आदी वसतिगृहातील विद्यार्थ्यांची अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन चरित्रावर भाषणे झाली.भाषण केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापक वाघमारे सरांच्या हस्ते पुष्पगुछ देवून सत्कार करण्यात आला. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती चे औचित्य साधून गुंजोटी ता.उमरगा येथील माजी सैनिक नागनाथ नाईकवाडे यांच्या वतीने वसतिगृहातील विद्यार्थ्यांना फळे वाटप करण्यात आले. यां कार्यक्रमांस वसतिगृहाचे अधीक्षक धम्मचारी प्रज्ञाजीत यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी आपल्या भाषणात अण्णाभाऊ यांच्या जयंती निमित्त शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी वसतिगृह महापुरुष जयंती कमिटीचे , शान गायकवाड,वागेश्र्वर काळे, विराज शिवशरणे,संविधान कांबळे, संघर्ष गायकवाड, वसतिगृह विद्यार्थी मंत्रिमंडळ मुख्यमंत्री अतुल गायकवाड उपमुख्यमंत्री सागर सास्तुरे व जयंती उत्सव मंडळाचे विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले . यां कार्यक्रमास वसतिगृहाचे सर्व कर्मचारीवर्ग पद्मिनी सुरवसे, राहुल कांबळे आदी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी आण्णाभाऊ साठे यांच्या नावाने घोषणा व जयजयकार करण्यात आला. यां जयंती कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वसतिगृह विद्यार्थी रत्नदीप गवळे ८ वी यांनी केले तर उपस्थितांचे आभार संतोष मोरे यांनी मानले.

# पुढील चार महिन्यानंतर मीच आमदार होणार : अभिजीत पाटील

## पंढरपुरात ४०सह भला मोठा हार व हजारोच्या उपस्थितीत कार्यकर्त्यांनी गर्दी करून अभिजीत पाटलांचा केला वाढदिवस



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत आबा पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त अत्यंत जल्लोषपूर्ण व थाटामाटात वाढदिवस साजरा केला असून यामध्ये त्यांनी दिवसभराच्या भेटीगाठी नंतर, पंढरपूर येथील आपल्या कार्यालयाच्या ठिकाणी सर्व समर्थक व कार्यकर्त्यांचा सत्कार स्वीकारला. विधान भवनाचे छायाचित्र असलेला फलक व मोठा केक कापून अभिजीत आबा पाटील व त्यांच्या सर्व कारखान्याच्या संचालक व सर्व समर्थकांनी मिळून वाढदिवस साजरा केला यावेळी बोलताना अभिजीत पाटील म्हणाले की; विठ्ठल सहकारी साखर कारखान्याला मोठी मदत झाल्यामुळे, सर्व आमच्या विठ्ठल परिवारातील समर्थकांना व कार्यकर्त्यांना ऊर्जितावस्था प्राप्त झाली असून, यामुळे कारखान्याच्या तर प्रश्र्न सुटणार आहेतच पण येत्या दोन महिन्यांमध्ये आपण आगामी विधानसभा निवडणुकीसाठी सज्ज राहायचे असल्याचे यावेळी अभिजीत पाटील यांनी सांगितले.

यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले की माढा मतदारसंघात त्यांच्या त्यांच्यात उमेदवारी ठरत नसून तिकडे तर विरोधकाला उमेदवारी मिळते का? नाही? असे चित्र निर्माण झाले आहे. पण माढा का पंढरपूर मंगळवेढा दोन्ही मतदारसंघाचा निर्णय हा ऐनवेळी घेतला जाणार असून आपल्या सर्व समर्थक व कार्यकर्त्यांनी दोन्ही मतदारसंघात तयारी लागावे. दोन महिन्यात आपल्याला रन खेळायचे असून त्यामुळे आत्तापासूनच त्या रणाची तयारी आपल्याला करायची आहे. इतक्या दिवस आम्हाला हिणवले गेले की पोरा पोरांची पार्टी असून यांना कोणी गांभीर्याने घेऊ नका असे म्हणत असताना आम्ही विठ्ठल सहकारी साखर कारखान्याची निवडणूक जिंकली. आगामी विधानसभा निवडणुकीला सामोरे जाणार असून आपण सर्वांनी साथ द्यावी. यासाठी आपण सर्वांनी मदत करणार का? असे अभिजीत पाटील यांनी विचारलं तर उपस्थित सर्व कार्यकर्त्यांमधून मोठ्या आवाजात होकार आल्यामुळे अभिजीत आबा पाटील व त्यांच्या सर्व समर्थकांनी व कार्यकर्त्यांनी मोठा जल्लोष केला!

एकंदरीत माढा मतदारसंघाला जोडली गेलेली पंढरपूर तालुक्यातील ४२ गावे व त्यांचे स्वतःचे गाव असणारे देगाव हे माढा मतदारसंघात असल्यामुळे व विठ्ठल सहकारी साखर कारखाना ही माढा मतदारसंघात असल्यामुळे या मतदारसंघातही मोठी ताकद अभिजीत आबा पाटील यांच्या असून काही माढा तालुक्यातील प्रतिष्ठित नेते मंडळींनी ही अभिजीत आबा पाटील यांची भेट घेऊन आपण माढा मतदारसंघातून निवडणूक लढवावी अशी मागणी केली असल्याचे खात्रीला वृत्त असून पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघापेक्षा तुम्हाला कधीही माढा मतदारसंघ सुरक्षित असून या मतदारसंघातून आपण निश्र्चितच विधान भवनात जाणार आहे. सांगितले आहे त्यामुळे आगामी दोन महिन्याच्या कालावधीमध्ये पंढरपूर मंगळवेढा किंवा माढा मतदारसंघातून असा जरी प्रश्र्न असला व कोणत्या पक्षातून हे जरी कार्यकर्त्यांना बुचकात टाकणारा प्रश्र्न असला तरी सुद्धा अभिजीत आबा पाटील यांनी विधानसभा निवडणुकीचे रणसिंग फुंकले असल्याचे या कालच्या कार्यक्रमावरून दिसत आहे.

**या वाढदिवसाच्या शुभेच्छा अभिजीत आबा पाटील यांना देण्यासाठी विशेषता केज विधानसभा मतदारसंघाचे मा.आमदार, पृथ्वीराज शिवाजी साथे व व अभिजीत आबा पाटील यांचे सासरे मा. जि प सदस्य सुरेश तात्या पाटील, याचबरोबर पंढरपूर -मंगळवेढा सांगोला मोहोळ व माढा विधानसभा मतदारसंघावर प्रभाव असणाऱ्या सर्व प्रतिष्ठित नागरिकांनी अभिजीत आबा पाटील यांना शुभेच्छा देण्यासाठी एकच मोठी गर्दी केली होती यामुळे या वाढदिवसाला यात्रेचे स्वरूप आले होते.त्यामुळे पंढरपूर पुणे रोड वरील दोन्हीकडची वाहतूक मोठ्या प्रमाणात ठप्प झाली होती.**

**पंढरपूर-मंगळवेढा व माढा विधानसभा मतदारसंघांमध्ये विखुरल्या गेलेल्या विठ्ठल परिवाराचे नेते असलेली चेअरमन अभिजीत पाटील यांच्या वाढदिवसा चे औचित्य साधून झालेल्या कार्यक्रमांमध्ये अभिजीत पाटील यांनी अनपेक्षित पणे आपल्या भाषणातून फटकेबाजी केल्यामुळे अभिजीत पाटील यांच्या विरोधकांमध्ये , आज सकाळपासून मोठी चर्चा रंगली आहे फक्त माढा विधानसभा का पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा हा प्रश्र्न अनुत्तरीतच राहिला असून लवकरच याची उकल होण्याची शक्यता आहे.**

# जनता विद्यालय नांदुर्डीमध्ये विज्ञान छंद मंडळाची स्थापना

**दैनिक यशसिध्दि न्यूज**




निफाड/प्रतिनिधी :जनता विद्यालय नांदुर्डी येथे विज्ञान छंद मंडळाचे उद्घाटन करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक . डावरे डी. ए. होते .व्यासपीठावर पर्यवेक्षक दाते आर. पी ,डॉ.संजयकुमार आहेर, शिंदे टी. जी. पवार व्ही. के., जाधव डी. जी. जाधव एस बी , निकम एच डी, . डुकरे एन जी बर्वे ,श्रीम.मोतींगे एस. आर.,श्रीमती आहेर पी. बी. उपस्थित होते . या सर्व मान्यवरांच्या शुभ हस्ते विज्ञान छंद मंडळाचे उद्घाटन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे विज्ञान शिक्षक पगारे आर. व्ही. यांनी केले. यात यांनी विज्ञान छंद मंडळ स्थापन करण्यामागचा हेतू व उद्देश, विविध उपक्रम,समजावून दिला.विज्ञान व तंत्रज्ञान म्हणजे काय व मानवाने विज्ञानाचा वापर कल्पकता वाढवण्यासाठी कसा करता येऊ शकतो, याबद्दल मार्गदर्शन केले . विचारक्षमता,वैज्ञानिक दृष्टिकोन,कल्पकता या सर्व गोष्टी मुलांमध्ये रुजावी यासाठी विज्ञान छंद मंडळाची स्थापना केली जाते असे प्रतिपादन केले.प्रत्येक गोष्ट तार्किक पद्धतीने पडताळून मगच ती स्वीकारली पाहिजे प्रत्येक गोष्टी मागे असणारा कार्यकारण भाव जाणून घेणे हे महत्त्वाचे आहे याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

याप्रसंगी अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापक डावरे डी ए व पर्यवेक्षक दाते आर पी यांनी कल्पकता ही व्यक्तिमत्व विकासासाठी व संशोधकवृत्ती वाढीसाठी किती आवश्यक आहे याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी जिज्ञासू वृत्ती वाढवावी आणि विज्ञानातील संशोधक निर्माण व्हावे यासाठी विज्ञानाच्या विविध स्पर्धेत सहभाग घेत जिज्ञासू वृत्तीचे दर्शन घडवावे तसेच विविध विज्ञान प्रकल्प भारतीय शास्त्रज्ञांच्या शोधांचा अभ्यास करून नावीन्यपूर्ण प्रकल्प तयार करावे असेही आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मुलभुत विज्ञानातील विविध तत्वे,संबोध, समजावुन घेवुन त्यांचे सामान्यीकरण करून आपल्या रोजच्या आयुष्यामध्ये कशाप्रकारे उपयोगात येते हे उदाहरणासह स्पष्ट केले.सी.वी.रमण यांचे संशोधन तसेच व्हॅक्सिन मेकॅनिझम,मेरी क्युरी व त्यांचे शोध व संशोधन तसेच अब्दुल कलाम या शास्त्रज्ञांच्या कार्यातून वैज्ञानिक दृष्टिकोन वाढीस विद्यार्थ्यांना केले. विद्यार्थी मनोगतात गौरव डेर्ले याने वैज्ञानिक दृष्टिकोन व त्याचे पर्यावरणाशी असणारे नाते याविषयी माहिती सांगितली व विज्ञान छंद मंडळातील निवड झालेल्या विद्यार्थ्यांना पुष्प गुच्छ देऊन सन्मान व अभिनंदन करण्यात आले विज्ञान छंद मंडळ उद्घाटन कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शालेय मंत्री मंडळ यांनी परिश्रम घेतले.

# राष्ट्रीय लंगडी स्पर्धेत पालवी शाळेचे विद्यार्थी प्रथम

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

भिवंडी/मिलिंद जाधव : शिर्डी येथे झालेल्या राष्ट्रीय बॉक्स लंगडी स्पर्धेत महाराष्ट्र संघातुन पडघा येथील आर. के. पालवी शाळेतील विद्यार्थी सहारा गणेश जोशी, तनवी महेश पाटील, मानसी विजय माळी वेदिका सोपान सांबरे, मनीष संदीप पाटील, वंश यशवंत चोरघे भाविक दिनेश सपाट यांच्या उत्तम कामगीरीने महाराष्ट्र संघाला प्रथम क्रमांकाने विजय मिळवुन दिले आहे. तर आर के पालवी स्कूल पडघा, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांच्या कडून सर्व स्तरावरून पाळवी इंग्रजी मिडीयम स्कूलच्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन होत आहे. यावेळी संघाचे प्रशिक्षक भगवान पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले असून शाळेचे संस्थापक रविंद्र पालवी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.



# नळदुर्ग पोलीसांनी १ कोटी ५ लाख ७८ हजार ८०० रुपयेचा गांजा मोठया शिताफीने पकडला

## नळदुर्ग पोलिसांची मोठी धडक कारावाई

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : उमरग्याहुन सोलापुरकडे जाणाऱ्या स्कार्पिओ गाडीतुन १ कोटी ५ लाख ७८ हजार ८०० रुपयाचा गांजा नळदुर्ग येथील राजा बागसवार दर्गाहसमोर राष्ट्रीय महामार्गावर नळदुर्ग पोलिसांनी मोठ्या शिताफिने पकडला आहे. नळदुर्ग पोलिसांच्या या कारवाईचे सर्व स्तरातुन स्वागत होत आहे.



सोलापुर --हैद्राबाद राष्ट्रीय महामार्गावरून नेहमीच गांजासह गुटख्याची कायम तस्करी सुरु असते. दि. ३० जुलै रोजी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास नळदुर्ग पोलिसांची रात्री राष्ट्रीय महामार्गावर गस्त सुरु होती यावेळी उमरग्याहुन सोलापुरकडे भरधाव वेगात स्कार्पिओ गाडी क्र. एम. एच. ०८ झेड ५६८४ ही जात असताना पोलिसांना संशय आल्याने त्यांनी नळदुर्ग येथील राष्ट्रीय महामार्गवर ही गाडी अडविली. गाडी थांबल्यानंतर गाडीची तपासणी केल्यानंतर गाडीत मोठ्याप्रमाणात गांजा आढळून आला.

यावेळी अतिष राजकुमार माने याला पोलिसांनी ताब्यात घेऊन त्याच्याकडे चौकशी केल्यानंतर हा गांजा आपण सोलापुरला घेऊन जात असल्याचे सांगितले. त्यांचबरोबर त्याच्याकडे चौकशी केले असता यामध्ये भीमराव दिलीप खडसुळे, राम दिलीप खडसुळे, डी. जे. चहाविक्रेता, कळवे, रवी सर्व रा. सोलापुर व राहुल रा. अहमदनगर हे यामध्ये सहभागी असल्याचे निष्पन्न झाले.या सर्व आरोपीवर नळदुर्ग पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असुन यातील अतिष राजकुमार माने याला अटक करण्यात आली आहे.

स्कार्पिओ गाडीतुन पोलिसांनी एकुण ५२८ किलो गांजा जप्त केला आहे त्याची किमत १ कोटी ५ लाख ७८ हजार ८०० रुपये इतकी किमत आहे. गांजा व स्कार्किपओ गाडी असा एकुण १ कोटी १५ लाख ७८ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. अलीकडच्या काळात राष्ट्रीय महामार्गावर इतक्या मोठ्या किमतीचा गांजा पकडण्याची ही पहिलीच वेळ आहे.याबाबतचा पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक कांगुने हे करीत आहेत. सदरील कारवाई नळदुर्ग पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक गजेंद्र सरोदे, सहाय्यक पोलिस निरीक्षक कांगुने, सुरज देवकर आटुळे, पोलिस उपनिरीक्षक ईश्वर नांगरे, गिते यांच्यासह पोलिस कर्मचाऱ्यांनी केली आहे.पोलिसांच्या या कारवाईचे सर्वस्तरातुन स्वागत होत आहे.

# अण्णाभाऊ साठे यांनी साहित्यातून समाजाच्या वेदना मांडल्या...!

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

गोदिंया : समाजाचे चिंतन आणि सामाजिक सलोखा राखण्याचे काम साहित्य करत असते. साहित्य हे समाजाचा आरसा आहे तर साहित्यिक हे साहित्याला आकार देणारे व्यक्तिमत्त्व असतात. समाजात जागृती व प्रबोधन करण्यासाठी साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या साहित्यकृतीने समाजाचे चित्र बदलविणारे एकमेव साहित्यिक ते अण्णा भाऊ साठे आहेत. अन्याय, अत्याचार असे विषय हाताळत साहित्याच्या जोरावर अण्णा भाऊ साठे यांनी समाजाच्या वेदना मांडल्या आहेत. असे प्रतिपादन मुख्याध्यापक रविशंकर इटुले यांनी केले. ते अध्यक्ष स्थानावरून बोलत होते. यावेळी कार्यक्रमाला उपस्थित प्रदीप ढवळे, नीता भलमे, साधना पारधी, अस्मिता तेलंग, मुन्नाभाई नंदागवळी, कार्तिक शहारे, स्वाती राणा, अर्चना चव्हाण आदी शिक्षकवृंद होते.

याप्रसंगी साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे याची जयंती तसेच लोकमान्य टिळक यांचा स्मृतीदीन साजरा करण्यात आला. दोन्ही महापुरुषांना पुष्पमाला अर्पण केले व अभिवादन करून दिप प्रज्वलन करण्यात आले. सदर कार्यक्रम हा



अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा नंगपूरा-मुर्री येथे सकाळी ११.१० वाजता पार पडला. मान्यवरांनी विचारांवर प्रकाश टाकला.

संचालन व आभार शाळेतील विद्यार्थ्यांनी केले तर यशस्वीतेसाठी सांस्कृतिक समितीने सहकार्य केले.

# डुबेरे येथील जनता विद्यालयात लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन




**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सिन्नर:डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे यांची जयंती संयुक्तपणे साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक रामदास वाजे होते. व्यासपीठावर ज्येष्ठ शिक्षक दिगंबर जाधव, सोमनाथ गिरी, सोमनाथ पगार,कचेश्वर शिंदे ,रेखा खंडीझोड आदी उपस्थित होते. उपस्थितांच्या हस्ते टिळक व साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले होते .टिळक व साठे यांच्या जीवन व कार्याचा परिचय संस्कृती सदगीर, स्वरा वारुंगसे,देवांश वाडेकर, तन्वी कुटे, गौरी वाजे,आरोही जाधव या विद्यार्थ्यांसह उपशिक्षक अरुण डावरे यांनी करून दिला. यावेळी बोलतांना कार्यक्रमाचे अध्यक्ष वाजे म्हणाले की,टिळक यांनी भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अथक परिश्रम घेतले.

आपल्या वृत्तपत्रातून इंग्रज सरकारविरुद्ध जनजागृती केली. म्हणून त्यांना असंतोषाचे जनक म्हणतात.तसेच अण्णाभाऊ साठे हे थोर समाजसुधारक होते. आपल्या साहित्यातून त्यांनी दलित, कष्टकरी व कामगारांचे प्रश्न मांडले.टिळक व साठे यांचे कार्य उल्लेखनीय आहे. म्हणून त्यांच्या कार्याचा इतरांनी आदर्श घ्यावा असे आवाहन वाजे यांनी केले. सूत्रसंचालन सुषमा थोरात यांनी केले तर आभार सोमनाथ गिरी यांनी मानले .

यावेळी कार्यक्रमास विद्यालयातील सुनिल ससाणे,डी. ए. रबडे, टी. के.बहिरम,शिवनाथ हुजरे, प्राध्यापक रामदास वारुंगसे, वरिष्ठ लिपिक राणी शिंदे ,रोहिणी भगत आदींसह शिक्षक ,शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# अण्णाभाऊ साठे यांचे कार्य समाजाला प्रेरणादायी : हर्षवर्धन पाटील

**दैनिक यशसिद्धी**

इंदापूर/अतुल सोनकांबळे : साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांनी जीवनभर विविध क्षेत्रात केलेले कार्य महान असून, आजच्या समाजाला अण्णाभाऊंचे कार्य प्रेरणादायी आहे. अण्णाभाऊंनी विपुल साहित्य निर्माण केले, त्यांच्या साहित्यावर शेकडो पीएचडी केल्या गेल्या, असे गौरवोद्गार राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी गुरुवारी (दि.१) काढले. इंदापूर तालुक्यात विविध गावांमध्ये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०४ व्या जयंती निमित्त हर्षवर्धन पाटील यांनी



भेट देत अण्णाभाऊंच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केले तसेच अण्णाभाऊंच्या प्रतिमेचे पूजन करून विनम्र अभिवादन केले. सदर प्रसंगी विविध गावांमध्ये आयोजित कार्यक्रमांमध्ये हर्षवर्धन पाटील बोलत होते. ते पुढे म्हणाले, अण्णाभाऊंची फकीरा कादंबरी घराघरात पोहचली आहे. त्यांच्या 'फकिरा' या कादंबरीला १९६१ मध्ये राज्य शासनाच्या उत्कृष्ट कादंबरीचा पुरस्कार मिळाला. रशिया मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य पोवाड्याच्या माध्यमातून त्यांनी अजरामर केले आहे. अण्णाभाऊंनी ३५ कादंबऱ्या, ३ नाटके, १० पोवाडे लिहिले.

त्यापैकी ८ कादंबऱ्यांवर मराठी चित्रपट निघाले. परिवर्तन चळवळीला बळ देणारे साहित्य अण्णाभाऊ साठे यांनी निर्माण केले. मानवी जीवनाचे वास्तव जीवन दर्शन त्यांच्या साहित्यातून होते, असे हर्षवर्धन पाटील यांनी नमूद केले.

इंदापूर तालुक्यात विविध ठिकाणी आयोजित जयंती कार्यक्रमांमध्ये हर्षवर्धन पाटील यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधला.

# उद्धवजी ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त शेतकऱ्यांना पीक फवारणी साहित्य वाटप

## शिवसेना सहसंपर्कप्रमुख संतोष सोमवंशी यांचा उपक्रम



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

औसा प्रतिनिधी/अमर जाधवः शिवसेना पक्षप्रमुख तथा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त गोंद्री मोड (औसा) येथे महाराष्ट्र राज्य बाजार समिती संघाचे उपसभापती तथा सहसंपर्कप्रमुख संतोष सोमवंशी यांच्यावतीने शेतकऱ्यांना पीक फवारणी औषधाचे वाटप करण्यात आले.

शेतकऱ्यांना सध्या शेतीमालाला भाव नाही. पीकविमा मिळाला नाही. अशा परिस्थितीत यावर्षी पाऊस चांगला झाला आहे आणि पिकाला सध्या फवारणीच्या औषधाची गरज आहे, ही जाणीव ठेवून संतोष सोमवंशी यांनी १२०० शेतकऱ्यांना पीक फवारणी औषधाचे वाटप केले.उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त गेली दहा वर्षे संतोष सोमवंशी यांच्यावतीने नेत्र तपासणी, शस्त्रक्रिया शिबिरे, दिव्यांगांना साहित्य वाटप, शेतकऱ्यांना सवलतीच्या दरात फवारे वाटप, औसा किल्ला येथे शस्त्र प्रदर्शन, शालेय साहित्य वाटप, छत्री वाटप, असे विविध समाज उपयोगी उपक्रम राबविले गेले. यावर्षी अडचणीत असलेल्या गोरगरीब शेतकऱ्यांना खरीप पिकांवर फवारणीसाठी औषधांचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमास युवा सेना जिल्हाप्रमुख दिनेश जावळे, खरेदी विक्री संघाचे उपसभापती शेखर चव्हाण, बाजार समिती माजी उपसभापती किशोर जाधव, उपतालुकाप्रमुख नारायण भोसले, शाहूराज जाधव, श्रीहरी काळे, होळी चेअरमन, नंदकुमार पाटील, हासेगाव व्हाईस चेअरमन संगमेश्वर बावगे, धानोरा चेअरमन विक्रम पाटील, लोदगा चेअरमन शरद भाईबार, हिप्परसोगा सरपंच मनोज सोमवंशी, धानोरा सरपंच सुरेश मुसळे, शरद गरड, लोदगा व्हाईस चेअरमन चंद्रकांत तळेगावे, इंद्रजीत शेंडगे, आप्पासाहेब सरवदे, मारुती मगर, इनुस बोपले, संजीव सोमवंशी, सुनिल खंडागळे आदी शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संपली आहे लीज साहेब लक्ष द्या प्लीज; अशोक नगरवासीयांचा एल्गार

**दैनिक यशसिद्धी**

मंगरूळपीर/तालुका प्रतिनिधी :नियमित मुख्याधिकारीच नसलेल्या मंगरूळपीर नगर परिषदेमध्ये समस्यांची रांगच लागलेली असते. ठेकेदारांच्या कामासाठी रात्री उशिरापर्यंत सुरू असलेली नगरपरिषद मात्र सर्वसामान्य व्यक्तींच्या निवेदनाला कशी केराची टोपली दाखवते याचे नवीन उदाहरण मंगरूळपीर शहरात पाहायला मिळाले.

वाशिम मंगरूळपीर राज्य महामार्गाच्या पूर्व दिशेला मंगरूळपीर शहरात अशोक नगर दलित वस्ती आहे. सदर वस्तीला लागून महसूल विभागाने महत्त्वाचे भूखंड व्यावसायिकांना लीजवर दिले होते सदर भूखंडाची लीज संपली आहे. परंतु भ्रष्टाचाराने माखलेल्या नगर परिषदेतील काही कर्मचाऱ्यांनी लीज संपलेली



महसूल विभागाची जागा एका व्यावसायिकाच्या नावावर करून दिल्याचा प्रताप अशोक नगरवासियानी उघडकिस आणला. तहसील प्रशासनाला निवेदन देत या विषयावर कार्यवाही करण्याची मागणी अशोक नगर परिसरातील नागरिक तसेच काही राजकीय पुढारींनी केली.

येथे एका व्यावसायिकाने चक्क सिमेंटचे गोडाऊन थाटले आहे. सिमेंटच्या गाड्यांची ये जा होत असल्याने आधीच अरुंद रस्ते असलेल्या अशोक नगर वस्तीमध्ये नागरिकांना अडचणीचा सामना करावा लागतो तसेच सदर सिमेंटची धूळ उडून परिसरामधील अबाल वृद्धांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाल्याची चिंता सदर निवेदनामध्ये व्यक्त केली होती.परंतु तहसील प्रशासनाकडून यावर कुठलेही ठोस पाऊल न उचलल्या गेल्यामुळे अशोक नगर परिसरातील नागरिकांनी तहसील कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू केले आहे. त्या परिसरातील महसुली जागेची लीज संपल्यावरही ती जागा दुसऱ्याच्या नावे हस्तांतरण करण्याचा प्रताप करणाऱ्या नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांवर कार्यवाही करण्यात यावी तसेच त्या ठिकाणी असलेले सदरचे अवैध अतिक्रमण पाडण्यात यावे अशा आशयाचे पत्र २२ जुलै रोजी प्रशासनास दिल्याचे कळते. यावर माजी नगरसेवक सचिन पवार, विनोद पाटील ,राजू जयस्वाल, ग्यानराव भडागे तसेच परिसरातील नागरिक बजरंग इंगोले, अजय भालेराव,गोपाल भगत इत्यादींच्या स्वाक्षरी आहेत.त्यामुळे लीज संपलेल्या जागेला दुसऱ्याचे नावे करून देणाऱ्या कर्मचाऱ्यांवर प्रशासन काय कार्यवाही करते .



दत्तवाड तालुका शिरोळ येथील विद्यमान ग्रामपंचायत सदस्य संजय शिवगोंडा पाटील यांची उपसरपंच पदी निवड करण्यात आली.यावेळी सत्कार करताना सरपंच चंद्रकांत कांबळे,श्री गुरुदत्त शुगर संचालक बबनराव चौगुले, राजू पाटील,बी.वाय.शिंदे, डी. एन. सिदनाळे,सुरेश पाटील ,नूर काले, लाला मांजरेकर आदींनी सत्कार करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

# येडोळा येथे २५१ महिला लाभार्थीचे माजी लाडकी बहिण योजनेसाठी अर्ज ऑनलाईन दाखल

**दैनिक यशसिद्धी**

वागदरी /एस.के.गायकवाडः मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेसाठी तुळजापूर तालुक्यातील येडोळा येथे तब्बल २५१ महिला लाभार्थी चे अर्ज ऑन लाईन दाखल झालेले आहेत असी माहिती येथील विद्यमान सरपंच झिमाबाई रामसिंग जाधव यांनी दिली आहे. ग्रामीण भागात सतत सर्वर डॉऊनची समस्या निर्माण होत असताना देखील येडोळा ग्रामपंचायतीच्या ग्रामसेविका एस.एन.गोरे,संगणक परिचारक अमित लोंढे, अंगणवाडी कार्यकर्ती शितल लोंढे, सुवर्णा लोंढे, सुमन राठोड,ग्रा.प.शिपाई माणिक कांबळे, सामाजिक कार्यकर्ते नागेश लोंढे, तानाजी चव्हाण ,आशा कार्यकर्ती नैना कांबळे, कविता जाधव आदींच्या प्रयत्नातून येडोळा व येडोळा ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या तांड्यातील मिळून २५१ महिला लाभार्थी यांचे ऑन लाईन अर्ज दाखल करण्यात आले आहेत.

